अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# काळ्या पैशाच्या निर्मितीची दडलेली ऊर्जा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणामध्ये भ्रष्टाचार किंवा काळ्या पैशाचा उल्लेख केला नाही. परंतु आता हा काळा पैसा भारतात कसा निर्माण होतो याचा हळूहळू मागोवा घेतला जात आहे. काळ्या पैशाचा शोध घेण्यासाठी केंद्र सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपासपथकाने काही निष्कर्ष काढले आहेत. कारण सर्वोच्च न्यायालयाने काळ्या पैशाच्या निर्मितीचा शोध घेण्याचे आदेश केंद्र सरकारला दिले होते. एवढेच नव्हे तर हा पैसा निर्माण होणार नाही किंवा त्याची निश्चित कारणे सरकारला समजली पाहिजेत, असेही न्यायालयाने म्हटले होते. त्यानुसारच केंद्र सरकारने याबाबत विशेष तपासपथकांची स्थापना केली आणि गेल्या दोन-तीन महिन्यामध्ये तपास केल्यानंतर आपला पहिला अहवाल न्यायालयांना सादर केला त्यामध्ये देशातल्या अनेक ऊर्जा प्रकल्पांना लागणारी यंत्रसामुग्री परदेशातून मागविली जाते आणि त्याची अवाढव्य किंमत दाखवून काळा पैसा निर्माण केला जातो, याची माहिती घेत असताना जवळपास ६ हजार कोटींची जादा किंमत दाखविली गेली. जी काळा पैसा म्हणूनच गणता येऊ शकते. केवळ एखाद्या प्रकल्पासाठी जर इतक्या बिनधास्तपणे पैसा छुप्या पध्दतीने आणला जात असेल तर देशातल्या अनेक मोठ्या प्रकल्पांच्या अब्जावधी रुपयांच्या यंत्रसामुग्रीच्या खरेदीतून किती काळा पैसा निर्माण होत असेल. याची सहज कल्पना येते या तपास पथकाने केवळ २-३ महिन्यांमध्ये जर हा निष्कर्ष काढला असेल तर भारतात दरवर्षी किमान तीन लाख कोटींचा काळा पैसा निर्माण होत असावा. कारण खोटी कागदपत्रे खोटी बिले दाखवून केले जाणारे हे व्यवहार एखाद्या हवाला रॅकेटप्रमाणेच म्हणावे लागतील. आतापर्यंत या गोष्टींचा सरकारी पातळीवरून कधीच शोध घेतला गेला नाही म्हणून काळ्या पैशाला लगामही घालता आला नाही.

### काळा पैसा शोधणाऱ्याला महत्त्व द्या

गेल्या पाच वर्षांपासून देशभर काळ्या पैशाविषयी जोरदार चर्चा सुरू आहे. सरकारी पातळीवर चालणारा भ्रष्टाचार रोखण्याकरिता लोकपाल विधेयक आणण्यासाठी आंदोलन केले गेले. त्याचवेळी अण्णा हजारे, रामदेव बाबा या सगळ्यांनी परदेशात असलेला भारतीयांचा काळा पैसा परत आणावा म्हणून मागणीही केली. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये त्यावेळेच्या युपीए सरकारकडे ठोस कारवाईची मागणी केली गेली. त्याचवेळी लोकसभेत परदेशात ज्यांनी काळा पैसा ठेवला आहे, त्याची यादी तयार केली जात आहे असे उत्तर दिले गेले होते. त्यावेळचे अर्थमंत्री आणि आताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी काळा पैसा दडविणाऱ्यांची गय केली जाणार नाही. सगळ्यांची नावे जाहीर केली जातील, असे आवासनही दिले होते. परंतु यासंदर्भात कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. उलट सरकारला नावे माहीत असूनही ती दडविण्याचाच प्रयत्न झाला. कारण सातत्याने लोकसभेत या विषयावर चर्चा झाली त्यावेळी सरकारने आपल्याकडे २० जणांची नावे असल्याचे म्हटले होते, पण त्यांची नावे जाहीर करायला टाळाटाळ केली गेली. यावरून काळा पैसा दडविणारे आणि सत्ताधारी यांच्यामध्ये कसे मधुर आर्थिक संबंध असावेत हे स्पष्ट होते. सरकारने जाणूनबुजून काळ्या पैशाचा तपास लांबविण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा गैरफायदा संबंधित लोकांनी घेतला. या मधल्याकाळात त्यांनी आपला काळा पैसा दुसरीकडे हलवला आणि स्वत:चा बचाव करून घेतला. सर्वोच्च न्यायालयाला माहिती देताना विशेष पथकाने काळा पैसा असणाऱ्यांची नावे मिळविण्यात यूपीए सरकार अपयशी ठरल्याचे म्हटले आहे. खरे तर कोणत्याही सरकारवर टीका करण्याचा विशेष पथकाला अधिकार नाही. आताच्या सरकारकडून ही माहिती मिळवण्यासाठी तपास पथकाने कठोर प्रयत्न करायला काहीच हरकत नाही.

### हा योगायोग समजायचा का?

आज नव्या सरकारने अनेक नवे संकल्प जाहीर केले आहेत. अगदी स्वच्छतेपासून ते प्रत्येक गरिबाच्या बँक खात्यात एक लाख रुपये जमा करण्याच्या योजनेपर्यंतचा त्यात समावेश आहे. या योजनेसाठी जितका पैसा सरकारला लागेल त्यापेक्षाही पाचपट पैसा परदेशी बँकांमध्ये दडवलेला आहे. नरेंद्र मोदी यांना जर खरोखरच देशातील गरिबी कमी करायची असेल आणि सामान्य माणसाला महागाईसारख्या समस्येतून दिलासा द्यायचा असेल तर त्यांनी सर्वप्रथम हा काळा पैसा भारतात आणण्याच्या कामाला प्राधान्य दिले पाहिजे. आता तर त्यांच्याच सरकारने नेमलेल्या विशेष तपास पथकाने काळ्या पैशाचा उगम कसा होतो, याची पहिली झलक आपल्या पहिल्याच अहवालातून दाखविली आहे. या पथकाने देशातल्या ऊर्जा प्रकल्पासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या खरेदीतून काळा पैसा निर्माण होतो असा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढला आहे. इतर अनेक मार्गांनी काळा पैसा निर्माण होतो, काही दडविला जातो. परंतु देशाच्या विजेची किंवा ऊर्जेची गरज भागविणाऱ्या या प्रकल्पातूनच काळ्या पैशाला ऊर्जा मिळते, हे सत्य उजेडात येत आहे. या एकाच उदाहरणावरून त्याची कल्पना येते. गेल्याच महिन्यात नरेंद्र मोदी यांनी एकाच कंपनीने बांधलेल्या मोठ्या जलविद्युत प्रकल्पाचे उद्घाटन केले आणि आता अशा ऊर्जा प्रकल्पाबाबत विशेष तपासपथकाने काळ्या पैशाचा ठपका ठेवावा, हा योगायोग समजायचा का असा प्रश्न निर्माण होतो. ऊर्जा प्रकल्प हे एक उदाहरण झाले. अशा प्रकारे वेगवेगळ्या माध्यमातून काळा पैसा निर्माण होत राहतो आणि परदेशात पाठवला जातो. त्याचा बंदोबस्त करायचा असेल तर उगम आणि पळवाटा या दोन्हींवर उपाययोजना कराव्या लागतील. अन्यथा काळा पैसा निर्माण करणारे लोक या ना त्या मार्गाने काळ्या पैशाची निर्मिती करीत राहतील. सरकारने त्या दिशेने एक पाऊल टाकलेले आहे. आता तर आणखी गती आली पाहिजे. याशिवाय काळ्या पैशाचा महत्त्वाचा स्त्रोत राजकारणातूनही होतो. त्याचा तर कुठेच हिशोबही नसतो आणि थांगपत्ताही लागत नाही. नव्या सरकारने या दुसऱ्या सत्ता म्हणजेच पॉवर सेंटरमधून निर्माण होणाऱ्या काळ्या पैशाचाही समाचार घेतला पाहिजे.